IMPACT FACTOR 6.10
ISSN 2393-8412
Indo Asian Social Science Research Journal (IASSRJ)
Issue : XIII, Vol. II
Aug. 2020 To Jan. 2021
www.irasg.com

Research Paper 13 Public Administration

# महिला सबलीकरण - अडथळे आणि उपाय

डॉ. पल्लवी इरलापल्ले
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
वसंतदादा पाटील महाविद्यालय,
पाटोदा, जि. बीड

## प्रस्तावना :

सामाजिक रथ पुढे नेणारा अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे स्त्री. स्वामी विवेकानंद म्हणतात 'स्त्री आणि पुरूष ही समाजरूपी स्थायी दोन चाके आहेत. यातील एक चाक जरी कमजोर पडले तरी समाजाच्या विकासाला गतीला खीळ बसेल'.[१] यावरून समाजाच्या विकासात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रीयांची भुमिका देखिल महत्वपूर्ण आहे. स्त्रीयांचा विकास म्हणजे देशाचा विकास व पर्यायाने राष्ट्राचा विकास होय.

स्त्री कुटुंबामध्ये अर्धांगिणी आणि माता अशा दोन महत्वाच्या भुमिका पार पाडाव्या लागतात. १६ व्या शतकात पत्नीने पतीची काळजी घ्यावी, त्याला व्यवस्थीत खाऊ, पिऊ घालावे आणि वंशाचा दिवा वाढवावा इथपर्यत स्त्रीचे कार्य मर्यादीत होते. केवळ 'चुल आणि मुलं' या कार्यक्षेत्रापुरती ती मर्यादीत होती. नंतर स्त्री घराबाहेर पडू लागली, पुरूषांच्या खांदयाला खांदा लाऊन काम करू लागली. स्त्री शिकली, अर्थाजन करू लागली, समाजात वावरू लागली, स्वत:चे अस्तीत्व सिद्ध करू लागली. म्हणजे स्त्री सबल झाली असे आपण म्हणू लागलो. परंतू स्त्री खरेच सबल झाली का? तिला कोणकोणत्या अडथळयांना सामोरे जावे लागते आणि त्यावर प्रत्येक घटकाद्वारे काय काय योजना केल्या आहेत याचा या ठिकाणी उहापोह होणार आहे.

## महिला सबलीकरण :

महिला सबलीकरणाची संकल्पना सर्वप्रथम इ.स. १९६० मध्ये अमेरिकेतील काळय जहालवादी गटांनी मांडली. या गटाच्या स्त्रीयांनी म्हणले की आम्ही स्त्रीया नाहीत का आम्हाला अधिकार नाहीत का? आणि इथूनच या विचाराची सुरूवात झाली. स्त्रीयांच्

प्रश्नाकडे विचारपुर्वक लक्ष दिले जाउ लागले. व्यक्ती म्हणून स्त्रीयांकडे पहा आणि त्यांचा ही विकास करा ही विचारधारा नव्याने समाजापुढे आली आणि त्या संदर्भात पाउले उचलली गेली.

भारताच्या दृष्टीकोणातून महिला सबलीकरणाची संकल्पणा अत्यंत महत्वपूर्ण आहे. महिला सबलीकरण म्हणजे स्त्री नावाचा जो घटक आहे त्याला आपल्या जीवनातील प्रत्येक क्षेत्रात सामावून घेणे होणे. स्त्रीयांचा राजकीय क्षेत्रातील वावर, त्या सरकारी, निमसरकारी किंवा खाजगी क्षेत्रात अधिकारांच्या जागेवर असणे तसेच स्त्रियांनी सामाजिक, सांस्कृतीक क्षेत्रात पुढाकार घेणे या गोष्टी महिला सक्षमीकरणाच्या निर्देशक आहे. स्त्रियांच्या आत्मशक्तीचा विकास झाला तरी घरात आणि घराबाहेर ती क्रियाशिल असणे, तिच्या मताला किंमत असणे यासाठी सामाजिक आणि आर्थिक पाठबळ असणे जरूरी आहे.

महिला सबलीकरणाचा एक निर्देशक म्हणजे स्थावर मालमत्तेवर तिची मालकी असणे. सामाजिक, सांस्कृतीक कामगार संघटना यामध्ये तिचा तिव्र सहभाग तसेच स्थानिक स्वराज्य संस्था ते विधीमंडळ संसदेपर्यंत अधिकार पदावर असणे. एक नागरिक म्हणून स्त्री समाजिक योगदान करू शकते पण स्वतःच्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेणे हे देखिल महत्वाचे आहे आणि हेच खऱ्या अर्थाने सबलीकरण होईल.

**महिला सबलीकरणातील अडथळे :**

भारतीय समाजमनावर पितृसत्ताक कुटुंब पद्धतीचा पगडा आजही आहे. आजची स्त्री नोकरी करणारी, घराबाहेर पडून काम करणारी, असली तरी तिला घर, स्वयंपाक लेकरं या गोष्टी चुकलेल्या नाहीत. अर्थात स्त्री–शिक्षण, तांत्रिक व वैज्ञानीक प्रगती सामाजिक अधिनियम, घटनात्मक तरतुदी इ. मुळे स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टीकोणात काही अंशी बदल झालेला असला तरिही आजही स्त्रियांना सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात समानतेची वागणूक दिली जात नाही हे देखिल तितकेच खरे आहे.

आजही समाजात स्त्री जन्माचे स्वागत होत नाही. मुलगा पाहिले या हट्टापाई कित्तेक मुली गर्भातच मारल्या जातात, हुंडाबळी, अत्याचार, पळवून नेने व अपहरण, छेडछाड, महिलांना मारणे, जाळणे, उपाशी ठेवणे अशा कित्तेक घटना आजही समाजात आणि घरा घरात महिलांबाबतीत घडताना दिसून येतात.

भारतामध्ये कित्तेक महिलांना रक्ताक्षयाचा आजार आहे, गरोदरपणात कित्तेक महिला मृत्यूमुखी पडतात, अज्ञान, अंधश्रद्धा, उपवास, कुपोषण यामध्ये सगळयात जास्त बळी महिलांचा जातो. बलात्कार, छेडछाड, चारिष्याचे हनन, बाईपणा हे शब्द फक्त महिलांसाठी बनवलेले आहेत. तिला मागे खेचण्यासाठी याचा वापर केला जातो. जेणे करून तिचे मानसिक स्वास्थ देखिल चांगले राहणार नाही व महिला सक्षमिकरणातील हा सर्वात मोठा अडथळा आहे.

स्त्री शिक्षणाचा विचार केला असता "भारतामध्ये स्त्रीयांच्या साक्षरतेचे प्रमाण ६४ टक्के आहे. तर महाराष्ट्रात हे प्रमाण २५ टक्के आहे."[२] ग्रामीण भागामध्ये मुलींच्या